# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# परिपत्रक

Estd. 1962
NAAC 'A' Grade

## (पदविका / पदव्युत्तर पदविका / प्रमाणपत्र व इतर काही अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या पुर्नपरीक्षा)

उन्हाळी 2020 मधील पदविका / पदव्युत्तर पदविका / प्रमाणपत्र व इतर काही अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्र परीक्षांच्या परीक्षा ऑक्टोंबर, 2020 मध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर घेण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर परीक्षेच्या ~~परीक्षेच्या~~ कालावधीमध्ये काही विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा, कोवीड–19 प्रादुर्भाव, गैरहजर अथवा तांत्रिक कारणामुळे परीक्षेस प्रविष्ठ होता आलेले नाही. अशा विद्यार्थ्यांच्या पुर्नपरीक्षा आयोजित करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. पदविका / पदव्युत्तर पदविका / प्रमाणपत्र इत्यादी अभ्यासक्रमाच्या पुर्नपरीक्षा तसेच विषम सत्राच्या रिपिटर परीक्षा दि. 15 डिसेंबर, 2020 ते 31 डिसेंबर, 2020 या कालावधीमध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर सुयोग्य (Online/Offline) पध्दतीने आयोजित करण्यात येत आहेत.
2. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा 50 गुणांची, 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने होईल.
3. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका संबंधीत महाविद्यालयातील/अधिविभागातील शिक्षकांनी तयार करण्यात याव्यात. तसेच सदर परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर आयोजित करण्यात येवून सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासून प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत.
4. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेची आहे.
5. तसेच कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल बाबत योग्य ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ क्र.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/405**
**दिनांकः– 09 डिसेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
5. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
6. जनसंपर्क अधिकारी
7. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.